ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

# 25.

# भारतीय समाजातील समलैंगिकतेचा प्रश्न

**प्रा. यादव परमेश्वर दत्ताराव**

अलिकडच्या काळात समलैंगिकता हा विषय जगातील सर्वच राष्ट्रात बहूसंख्येने चर्चीला जात आहे. स्त्रि—पूरूष संबंधास एक पर्याय आणि विवाह संस्था संबंधाचा एक प्रश्न म्हणून समोर आला आहे. म्हणून समलैंगिकता आज वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, यांच्या अभ्यासाचा महत्वाचा विषय ठरत आहे. काही राष्ट्र समलैंगिकतेचा स्विकार करत नसले तरी त्याचे अस्तित्व जवळपास सर्वच संस्कृती व राष्ट्रात आढळून येते; परंतू समलैंगिक लोकांची संख्या किती आहे हे सांगणे कठीण आहे. प्राचीन संस्कृतीमधील समलैंगिकतेचे वास्तविक तथ्य त्या काळातील चित्र व शिल्पकलावरून स्पष्ट होतात. ज्यामध्ये दोन पुरूष आणि दोन स्त्रियामध्ये होणारे लैंगिक संबंध दाखविण्यात आले आहेत.

''समलैंगिकता म्हणजे कोणतीही व्यक्ति समानलिंगी व्यक्तिकडे लैंगिक व भावनिकदृष्टया आकर्षित होणे होय. एक पुरूष दुसऱ्या पुरूषाकडे किंवा एक स्त्री दुसऱ्या स्त्रीकडे जेव्हा लैंगिक आणि भावनिकदृष्टया आकर्षित होते तेव्हा त्यास क्रमश: 'पुरूषसमलिंगी' व 'स्त्रीसमलिंगी' किंवा 'गे' असे म्हणतात. तसेच जे व्यक्ति महिला आणि पुरूष या दोघाकडे आकर्षित होतात त्यांना 'उभयलिंगी' असे म्हटले जाते. म्हणूनच समलैंगिक, उभयलैंगिक आणि लिंगपरिवर्तीत लोकांचा मिळून 'एल.जी.बी.टी. समुदाय बनतो.''[१] सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, समलैंगिकता म्हणजे असे लोक की जे मानसिक व लैंगिक दृष्टीकोनातून समानलिंगी लोकांकडे आकर्षित होतात. समलैंगिक या संकल्पनेमध्ये केवळ समलिंगी लोकात लैंगिक संबंध प्रस्थापित झालेल्या लोकांचा समावेश होत नसून आजपर्यत समलिंगी लैंगिक संबंध प्रस्थापित न झालेल्या परंतू मानसिक व लैंगिक दृष्टीने समानलिंगी लोकाकडे आकर्षित झालेल्या लोकांचाही यात समावेश होतो.

**अध्ययनाची उद्दिष्टये:**

१. समलैंगिकता ही संकल्पना समजून घेणे.
२. समलैंगिकतेचे स्वरुप स्पष्ट करणे.
३. भारतातील समलैंगिकता व तिच्या कायदेशीर तरतुदीचे अध्ययन करणे.
४. भारतातील समलैगिकतेच्या समस्या जाणून घेणे.

**समलैंगितेचे स्वरूप:**

१. समलैंगिक अशाच लोकांना म्हटले जाते की जे समानलिंगी लोकांकडे लैंगिकतेने युक्त मानसिक व शारीरिक दृष्टीने आकर्षित होतात.
२. समलैंगिक पुरूषांना 'गे' आणि 'क्वीर' असे म्हटले जाते तर समलैंगिक महिलांना 'लैस्बियन' आणि 'डाइक' असे संबोधले जाते. एकंदरीत समलैंगिक संबंध असणाऱ्या सर्व लोकांना 'एल. जी.बी.टी. समुदाय' असे म्हटले जाते.
३. समलिंगी संबंध केवळ आजच्या आधुनिक समाजात आढळून येणारे संबंध नसून प्राचीन काळापासून त्याचे अस्तित्व समाजात गुप्त पध्दतीने असल्याचे आढळते.

४. काही राष्ट्र हे मान्य करीत नसले तरी जगातील जवळपास सर्वच संस्कृतीत व राष्ट्रात प्राचीन काळापासून ते आजपर्यत समलैंगिकतेचे अस्तित्व आढळते. मग ते काही राष्ट्रात उघडपणे तर काही राष्ट्रात छुप्या पध्दतीने होते.
५. समलैंगिक संबंधास जगातील सर्वच समाजात मान्यता नसून पाश्चात्य राष्ट्रातील काही राष्ट्रांनी त्यास मान्यता दिलेली आहे. तसेच ज्यू व ख्रिश्चन धर्मातील काही संप्रदायांनी त्यास मान्यता दिली असली तरी आजही हिंदू आणि मुस्लिम धर्माने समलैंगिकतेस मान्यता दिली नसून ते त्यास पाप मानतात.
६. समलैंगिकतेसाठी केवळ शारीरिक, मानसिक, धार्मिक, सामाजिक यातील नेमके कोणते कारण कारणीभूत आहे, यासंबंधी वैज्ञानिक, डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ, धार्मिक तत्ववेते, समाजशास्त्रज्ञ यांच्यात एकवाक्यता नाही.
७. समलैंगिकतेस इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेने मान्यता दिली असून भारतात ब्रिटिश सरकारद्वारे निर्मित १८६० साली भारतीय राज्यघटनेत कलम ३७७ नुसार गुन्हा मानला आहे. या कलम ३७७ विषयी आजही न्यायालय द्विधा स्थितीत आहे.
८. विषमलिंगी प्रमाणेच समलिंगी संबंधात प्रेम, विश्वास, जीवनसाथी, संपत्तीचा उत्तराधिकार, प्रजोत्पादन, विवाहास मान्यता असल्यास समाजात विवाह घडून येतात.

**भारतीय समाजातील समलैंगिकतेचा प्रश्नः**

विविधतेने नटलेल्या भारतीय समाजास प्राचीन संस्कृतीचा खुप मोठा वारसा प्राप्त झालेला आहे. विविध धर्म, भाषा, प्रदेश, वंश, जाती, उपसंस्कृतीचे लोक येथे राहतात. भारतीय समाजाने प्राचीन काळापासून ते आजपर्यत अनेक चढ—उतार पाहिलेले आहेत. भारताच्या सांस्कृतिक वारसाला धक्का देणारे अनेक प्रश्न व समस्याही निर्माण झाल्या. त्यातील एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आज भारतीय समाजासमोर उभा आहे. तो म्हणजे समलैंगिकतेचा, समलैंगिकता हा एक स्त्री—पुरूष संबंध व विवाह संस्थेला आव्हान व पर्याय देणारा प्रश्न म्हणून आधुनिक भारतीय समाजात चर्चिला जात आहे. प्राचीन काळापासून जगातील सर्वच राष्ट्रात कमी—अधिक प्रमाणात समलैंगिकतेचे अस्तित्व होते. परंतु असे असले तरी त्यास कोणत्याही समाज व राज्यव्यवस्थेने कधीही मान्यता दिली नव्हती, परंतु मागील काही वर्षात काही पाश्चिमात्य राष्ट्राने त्यास मान्यता दिल्याने भारतीय समाजातही समलैंगिक संबंधास मान्यता मिळवण्यासाठी काही संस्था, संघटना व व्यक्ती प्रयत्न करीत आहेत. भारतात समलैंगिक लोकांची संख्या किती आहे हे जरी सांगणे कठीण असले तरी पूर्वीपासून गुप्त पध्दतीने चालत आलेल्या समलैंगिक संबंधावरून आज बऱ्याच व्यक्ती, संघटना, समुदाय उघडपणे बोलत आहेत व समोर येऊन त्याचा पुरस्कार करत आहेत.

समलैंगिकता हा एका पुरूषाने दुसऱ्या पुरूषाशी व एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीशी लैंगिक संबंधाने आकर्षित होण्याचा प्रकार आहे. यास भारतीय समाजातील विविध धर्मसंस्था, विवाहसंस्था, राज्यसंस्था यांनी अनैसर्गिक संबंध म्हणून अमान्य करून त्यास एक पाप व गुन्हा मानले होते. १८६० साली लॉर्ड मेकॉलेंनी ब्रिटिश शासनासाठी भारतात कायदा बनवितांना इंग्लड मध्ये अस्तित्वात असलेला समलैंगिकता विरोधी कायदा कलम ३७७ ची निर्मिती केली. या कायद्या अंतर्गत नैसर्गिक व्यवस्थेच्या विरूध्द कोणत्याही स्वरूपाच्या केलेल्या लैंगिक संबधास गुन्हेगारी कृत्य म्हणून घोषित केले व त्यासाठी अधिकात अधिक जन्मठेपेची शिक्षा निर्धारित करण्यात आली. भारतीय स्वातंत्रपुर्व व नंतरच्या विविध न्यायालयीन निकालात या कलम ३७७ ची व्याख्या करतांना असे स्पष्ट करण्यात आले की, ‘‘कोणत्याही स्त्री—पुरूषातील नैसर्गिक लैंगिक संबंध सोडून इतर कोणतेही लैंगिक संबंध मग ते

एकमेकांच्या सहमतीने जरी असले तरी ते अनैसर्गिक मानून त्यास गुन्हा ठरविण्यात आले व त्यासाठी शिक्षेची व्यवस्था करण्यात आली.''[२] परंतु असे असले तरी भारतीय समाजात पुर्वीपासून ते आजपर्यंत गुप्त पध्दतीने समलैंगिक संबंध चालूच होते.

मागील काही दशकात समलैंगिक लोकांची वाढती संख्या आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रभावाने समलैंगिक संबंधाने प्रेरित समुदायाने समलैंगिक संबंधाच्या बंदी विरोधात आंदोलन सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून नेदरलॅड, नॉर्वे, बेल्जियम, स्पेन, दक्षिण आफ्रिका, कॅनडा व अमेरिकेतील काही राज्यांनी मान्यता दिल्यानंतर भारतातही या समुदायाकडून आंदोलनाला सुरूवात झाली व त्यास काही स्वयंसेवी संस्था, संघटना आणि व्यक्तिनी मान्यता देऊन त्यांची बाजू घेतली. त्यातील 'नाज फौंडेशन इंटरनॅशनल संस्था' ही महत्त्वाची असून या संस्थेने भारतीय राज्यघटनेतील ३७७ कलम रद्द करून समलैंगिक संबंधाना मान्यता मिळवून देण्यासाठी २००४ साली दिल्ली उच्च न्यायालयात केस दाखल केली. या संस्थेने न्यायालयात आपली बाजु मांडतांना त्यांनी स्पष्ट केली की, ''१) एकमेकांच्या संमतीने प्रस्थापीत केलेले समलिंगी संबंध व्यक्तिचा मुलभूत आधिकार आहे. २) समलिंगी संबंध हे नैसर्गिक व सामान्य आहेत. ३) समलैंगिकांना एका सामान्य नागरीकासारखे जीवन जगण्याचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे. ४) समलैंगिक लोकांचा समूह एक अल्पसंख्याक समूह आहे. ५) जगातील अनेक राष्ट्रात समलैंगिकतेला मान्यता दिलेली आहे आणि तसे भारतातही होणे आवश्यक आहे.''[३] परंतु त्यावेळी दिल्ली उच्च न्यायालयाने कायद्याच्या वैद्यतेला दिलेले आव्हान स्विकारण्याची आवश्यकता नाही असे स्पष्टीकरण देऊन ही केस दाखल करून घेतली नाही. या विरोधात गृहमंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले की, भारतीय संस्कृतीत समलैंगिक संबंधास परवानगी दिली जाऊ शकत नाही. गृहमंत्रालयाने समलैंगिक संबंधाला अत्यंत अनैतिक व सामाजिक व्यवस्थेच्या विरोधी मानून त्यास गुन्हयाच्या श्रेणी बाहेर काढण्यास न्यायालयात कठोर विरोध केला. गृह मंत्रालयाकडून बाजू मांडतांना विशेष सॉलिसिटर जनरल पी.पी.मल्होत्रा यांनी असे म्हटले की, ''भारतीय समाज इतर देशापेक्षा वेगळा आहे आणि तो परराष्ट्रीयांचे अनुकरण करू शकत नाही.''[४] २००६ साली सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला ही केस दाखल करून घेण्याचे सुचविले. यासंदर्भात २ जुलै २००९ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश अजित प्रकाश शाह आणि न्यायाधीश एस. मुरलीधर यांनी समलैंगिकता केसच्या संदर्भात निकाल देतांना असे स्पष्ट केली की, ''दोन प्रौढ व्यक्तींनी परस्परांच्या सहमतीने ठेवलेल्या लैंगिक संबंधाना गुन्हेगारी वर्तन मानने भारतीय राज्यघटनेच्या कलम २१, १४ व १५ मध्ये उल्लेख केलेल्या मूलभूत अधिकाराची आवहेलना आहे.''[५] असा निर्णय देऊन समलैंगिकतेला मान्यता दिली. म्हणजे उच्च न्यायालयाने दोन पुरूष किंवा दोन स्त्रियांनी आपल्या इच्छेने बंद खोलीत एकमेंकाशी लैंगिक संबंध ठेवणे हा गुन्हा नाही असे स्पष्ट केले. या निकालात भारत सरकार, दिल्ली सरकार, काही स्वयंसेवी संस्था, विशेषज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी आपली बाजू मांडली. भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनाने नाज संस्थाच्या बाजूने साक्ष दिली होती. लैगिंक संबंधाचा उद्देश केवळ प्रजोत्पादन आहे या काही संस्था व लोकांच्या तर्काला उत्तर देतांना न्यायाधिशांनी असेही स्पष्ट केली की, '' डॉक्टर व मानसोपचारतज्ञ समलैंकितेला शारिरीक रोग किंवा मानसिक असंतुलन मानत नाहीत, तर त्यास ते लैंगिक संबंधाचा एक प्रकार मानतात.''[६] या निर्णयानंतर भारतात अनेक ठिकाणी समलैंगिक समुहाकडुन आनंद उत्सव साजरा करण्यात आला. तसेच अनेक समलिंगी जोडप्यांमध्ये विवाह घडून आले. या संदर्भात आर.एम.एल. हॉस्पीटल मधील सायकायट्री डिपार्टमेंटच्या अध्यक्षा डॉ. स्मिता देशपांडे म्हणतात की,''ही काही नवीन गोष्ट नाही, पूर्वीही असे होत होते, परंतु तेव्हा कोणीही समोर येऊन बोलत नव्हते, पण आता पाश्चात्य देशांनी समलैंगिकतेस मान्यता दिल्यामुळे लोक समोर येत आहेत आणि हे योग्य पण आहे, कारण जर कोणी या विषयावर बोललेच नाही तर या समस्यावर कोणताच पर्याय निघणार नाही.''[७] परंतु ११ डिसेंबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय समितीने २ जुलै २००९ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय रद्द

करून समलैंगिकतेला गुन्हा मानणारे भारतीय राज्यघटनेतील कलम ३७७ पुन्हा लागु केले. न्यायाधिश जी. एस. सिंधवी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने असे म्हटले की, ''संसदेची इच्छा असेल तर कलम ३७७ मध्ये ते बदल किंवा रद्द करू शकतात. तसे पाहता कायदा बनविणे, रद्द करणे किंवा त्यामध्ये दुरूस्ती करण्याची जबाबदारी व अधिकार संसदेचाच आहे.''[८] तसे पाहता सर्वोच्च न्यायालय कधी—कधी संसदेच्या क्षेत्राधिकारात हस्तक्षेप करीत राहते, परंतु मानवीय दृष्टीने महत्त्वाच्या या समलैंगिकतेच्या प्रश्नावर त्यांनी कोणताही निर्णायक निकाल न देता हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी भारतीय संसदेवर सोपवली. यासंदर्भात फिल्मफेअर, समलैंगिक कार्यकर्ता आणि २०१० मध्ये शुरू केलेल्या वार्षिक एल.जी.बी.टी. फिल्म फेस्टिवल कशिश चे दिग्दर्शक श्रीधर रंगायान म्हणतात की, ''मी असे समझतो की, याला आव्हाण दिले पाहिजे, कारण की तुम्ही जोपर्यत समोर येऊन बोलणार नाहीत, तोपर्यत तुम्हाला अधिकार मिळणार नाहीत. आपण अशा सामाजिक विशेष वर्ग असलेल्या वस्तीत राहिला नाही पाहिजे, की ज्याठिकाणी आपण सर्व स्वत:ला गुन्हेगार समजु.''[९]

भारतीय समाजात समलैंगिकतेचा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियामध्ये अडकला असला तरी अनेक सुशिक्षित, अभ्यासक, अभिनेते, अभिनेत्री, व्यापारी व इतर प्रतिष्ठित लोक आज समलैंगिकतेचा पुरस्कार करू लागलेले आहेत, आणि त्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करीत आहेत. तसेच न्यायालयानेही ३७७ या कलमावर संसदेत चर्चा घडून आणण्याचे सुचविले आहे. आजपर्यंत लपून—छपून समलैंगिक संबंध ठेवणारे लोक आज उघडपणे कबुली देत आहेत व कायद्याची पर्वा न करता समलैंगिक संबंध व वैवाहिक जीवन प्रस्थापित करीत आहेत. कॉंग्रेस, भाकपा, आप या राष्ट्रीय पक्षांनी तर आपल्या जाहीरनाम्यात समलैंगिक संबंधाचा पुरस्कार करून यातील पिढीत लोकांना न्याय मिळवून देण्याचे वचन दिले आहे. तर दुसरीकडे 'दिल्ली कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइटस' आणि इतर विविध धार्मिक संघटना त्या विरोधात दंड थोपटत आहेत. म्हणजेच या विषयासंदर्भात भारतीय समाजातील सर्वच क्षेत्रातील लोक अनुकूल व प्रतिकूल अशी चर्चा करीत आहे.

**निष्कर्ष:**

१. समलैंगिकता म्हणजे दोन समानलिंगी व्यक्तिमध्ये लैंगिक संबंध प्रस्थापित होणे नाही तर एका पुरूषाने दुसऱ्या पुरूषांशी व एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीशी लैंगिक संबंधाने आकर्षित होण्याचा प्रकार आहे.
२. समलैंगिक संबंधाला प्राचीन काळापासून जगातील कोणत्याही शासन व समाजाने मान्यता दिलेली नव्हती तरीही सर्वच समाजात अशाप्रकारचे संबंध लपून—छपून चालू होते.
३. अनेक डॉक्टर व मानसोपचार तज्ञ लैंगिक संबंधाना केवळ प्रजोत्पादनाचे साधन मान्य करीत नसल्यामुळे ते समलैंगिकतेलाही लैंगिक संबंधाची एक पध्दती मानतात.
४. भारतीय समाजात मागील काही वर्षापासून समलैंगिक लोकांची वाढती संख्या, जगातील काही राष्ट्रांनी दिलेली मान्यता व व्यक्तिस्वातंत्र्याचा वाढता प्रभाव यामुळे भारतातही कलम ३७७ ने समलैंगिक संबंधाला घातलेल्या बंदी विरोधात अनेक स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सुशिक्षित, अभ्यासक, अभिनेते, अभिनेत्री, व्यावसायीक व विविध राजकीय पक्ष असे सर्वच वर्गातील लोक आवाज उठवत आहेत.
५. भारतीय समाजात सरोगेट मदर, सिंगल पेरेंट, लिव्ह इन रिलेशनशिप याप्रमाणेच समलैंगिकता ही विवाहसंस्थेतील नवीन पध्दती देखील बहूसंख्य लोकांकडून स्वीकारली जात आहे.
६. भारतीय राज्यघटनेतील समलैंगिक विरोधी कलम ३७७ व मुलभूत अधिकार असलेले कलम २१, १४ व १५ हे एकमेकांशी विसंगत असल्यामुळे न्यायालय देखील समलैंगिकते बाबतीत

द्विधा मन:स्थितीत आहे. म्हणूनच न्यायालयाने ३७७ कलमावर संसदेत चर्चा घडवून आणण्याचा सल्ला दिला.

**संदर्भ:**

१. समलैंगिकता, विकिपीडिया, https://mr-wikipedia.org/wiki
२. प्रकाश कुमार रे, समलैंगिकता: बहस के कुछ संदर्भ, https://bargad.org/2011/07/03
३. डॉ. गजेंद्र प्रताप सिंघ, समलैंगिकता का समाजशास्त्र, www.jagranjunction.com
४. डॉ. गजेंद्र प्रताप सिंघ, समलैंगिकता का समाजशास्त्र, www.jagranjunction.com
५. प्रकाश कुमार रे, समलैंगिकता: बहस के कुछ संदर्भ, https://bargad.org/2011/07/03
६. प्रकाश कुमार रे, समलैंगिकता: बहस के कुछ संदर्भ, https://bargad.org/2011/07/03
७. डॉ. गजेंद्र प्रताप सिंघ, समलैंगिकता का समाजशास्त्र, www.jagranjunction.com
८. श्रीनिवास, सेक्स, समलैंगिकता और हमारा पाखंड, १४ डिसें.२०१३, www.newswing.in
९. नयनतारा कीलाचंद, मुंबई जर्नल:चलिए समलैंगिता पर बात करे, www.googleweblight.com

❑❑❑